दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ५ वे अंक ७६ गुरूवार दि.२५ सप्टेंबर २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# उदगीर-जळकोट मतदार संघात नैसर्गिक अतिवृष्टीमुळे झालेल्या नागरिकांना नुकसान भरपाई द्यावी

## मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांची लेखी निवेदनाव्दारे मागणी

उदगीर/ प्रतिनिधी :- जगाचा पोशिंदा असलेल्या बळीराजाच्या पाठीशी महायुती सरकार खंबीरपणे उभे रहावे व उदगीर-जळकोट तालुक्यातील सन २०२५ मध्ये झालेल्या नैसर्गिक अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या नागरीकांना तात्काळ नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी एका निवेदनाव्दारे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे माजी मंत्री तथा उदगीर - जळकोट विधानसभा मतदार संघाचे आमदार संजय बनसोडे यांनी केली आहे. या बाबत आपण लवकरच मदत करु असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आ.संजय बनसोडे यांना दिले आहे. या निवेदनात आ.संजय बनसोडे यांनी, मतदार संघातील उदगीर-जळकोट तालुक्यात नैसर्गिक आपत्तीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामध्ये मृत पावलेल्या व्यक्ती, जनावरे, पडझड झालेली घरे, गोठे, सार्वजनिक/खाजगी मालमत्ता, तात्पुरत्या स्वरुपात निराधार झालेल्या व्यक्ती, शेतीपीक नुकसान, जमीन खरडून गलेले या सर्वांचे नुकसान झाले आहे. त्यामध्ये अतिवृष्टीमुळे उदगीर व जळकोट तालुक्यात मोठे नुकसान



झाले आहे. त्यामध्ये ०५ व्यक्ती मृत पावले आहेत. मृत पावलेल्या व्यक्तीना अद्यापपर्यंत कसलीही मदत देण्यात आलेली नाही. उदगीर तालुक्यातील मृत जानावरांची संख्या मोठ्या प्रमाणात असून त्यामध्ये मोठी दुधाळ जनावरे व लहान दुधाळ जनावरे यांचाही समावेश आहे. अद्यापपर्यंत या मृत पावलेल्या जनावरांना कसलीही मदत देण्यात आलेली नाही.

उदगीर तालुक्यात अंशतः पडझड झालेल्या पक्क्या घरांची एकूण संख्याही मोठी असून, अंशतः पडझड झालेल्या कच्च्या घरांची संख्या अडीचशेच्या जवळपास आहे व बाधित गोठयांचाही समावेश आहे. तसेच जळकोट तालुक्यातील अंशतः पडझड झालेल्या कच्च्या घरांची लक्षणीय आहे.

उदगीर तालुक्यात सार्वजनिक खाजगी मालमत्तेचे नुकसान होवून त्यामध्ये अतिवृष्टीमुळे खराब झालेल्या रस्त्यांची व पुलांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. अतिवृष्टीमुळे तात्पुरत्या स्वरुपात निराधार झालेल्या उदगीर तालुक्यातील शंभरच्या जवळपास कुंटुंबे आहेत व ४९७ बाधित व्यक्ती आहेत. शेतीपिकाचे नुकसान उदगीर तालुक्यातील बाधित गावांची संख्या ९७ आहे तर बाधित शेतकऱ्यांची संख्या साठ हजाराच्या जवळपास आहे. त्यामध्ये जिरायत आणि बागायत शेतकरी आहेत तर जळकोट तालुक्यातील बाधित गावांची संख्या ४७ व बाधित शेतकऱ्यांची संख्या एकवीस हजाराच्या जवळपास आहे. त्यामध्ये जिरायत व बागायतदार शेतकरी आहेत.

उदगीर तालुक्यातील जमीन खरडून गेली असून त्यामध्ये अनेक गावे बाधित आहेत त्यामध्ये हजाराच्या जवळपास शेतकरी आहेत. या वरील सर्व बाबींचा आपण सहानुभूतीपूर्वक विचार करुन उदगीर-जळकोट तालुक्यातील नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या हानीबाबत तात्काळ नुकसान भरपाई द्यावी अशी विनंती आ.संजय बनसोडे यांनी केली आहे.

## माला ताई मेश्राम दिशा महाराष्ट्राची साहित्यरत्न पुरस्काराने सन्मानित

नवी मुंबई / के. एच. हनवते :- संविधान गुण गौरव समितीच्या केंद्रीय सदस्यां आयु. माला ताई मेश्राम यांना दिशा महाराष्ट्राची या प्रतिष्ठित संस्थेकडून महाराष्ट्र राज्यस्तरीय साहित्य रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ही आपल्या सर्वांसाठी अतिशय अभिमानाची बाब आहे माला ताई या मूळच्या नागपूर येथील रहिवाशी असून ते नवी मुंबई नेरुळ येथे गेल्या अनेक वर्षापासून वास्तव्य आहे, तथागत भगवान गौत्तम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित संविधान ग्रंथाचे वाचन आजच्या तरुण युवकांनी केले पाहिजे हे समजावून सांगतात, सामाजिक धार्मिक क्षेत्रात



तसेच नेरूळ एक जयंती एक उत्सव समितीच्या ते महिला पदाधिकारी म्हणून तत्परतेने कार्यात अग्रेसर असणारे व्यक्तिमत्व म्हणजे माला ताई यांचे मनापासून खूप खूप अभिनंदन आणि त्यांना पुढील वाटचालीस मंगलमय कामना सर्व समाज बांधवातून होत आहे.

## कृषीमंत्री बांधावर जाताच शेतकऱ्यांचा घेराव; प्रचंड रोष अन् गंभीर आरोप, दत्तात्रय भरणेंनी लावला अधिकाऱ्यांना फोन म्हणाले तातडीने

राज्यातील मराठवाडा विदर्भ आणि सोलापूर जिल्ह्यात पावसाने थैमान घातलं आहे. या भागातील शेतकऱ्यांचं प्रचंड नुकसान झालं असून बळीराजा हवालदिल झाला आहे. मदतीची वाट पाहत आहे. काल मुंबईत मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी मदतीची घोषणा केली. तसेच संबंधित जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांना शेतकऱ्यांच्या बांधावर जाण्याचं आवाहन केलं होतं. त्यानुसार महायुती सरकारमधील सर्व मंत्री पालकमंत्री संबंधित जिह्याच्या पाहणी दौऱ्यावर आले आहेत.


कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी कृषी खात्याचा पदभार स्वीकारल्यानंतर आज जालन्यातील बदनापूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांनी नुकसानीची पाहणी केली. पण यावेळी कृषिमंत्र्यांना गरडा घालत शेतकऱ्यांनी प्रश्नांची सरबत्ती केली. शेतकऱ्यांच्या प्रचंड रोषाचा सामाना कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांना सामना करावा लागला. शेतकऱ्यांनी आपली व्यथा कृषीमंत्र्यांना पुढे मांडल्या. जिल्हाधिकारी मॅडमने फळबागांचे पंचनामे करु नका, असे आदेश दिले असा आरोप शेतकऱ्यांनी केला.

## भारत प्रामुख्याने आमच्यासोबतच ; रशिया-युक्रेन संघर्षादरम्यान झेलेन्स्की यांचे धक्कादायक विधान

रशिया-युक्रेन युद्धादरम्यान, भारत या संघर्षाला खतपाणी घालत आहे का, असे प्रश्न अनेकदा उपस्थित केले करण्यात आले होते. यावरच युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी यावर स्पष्टपणे उत्तर दिले. त्यांनी सांगितले की,भारत प्रामुख्याने युक्रेनच्या बाजूने आहे आणि कोणत्याही प्रकारे संघर्षाला प्रोत्साहन देत नाही.

युक्रेनच्या राष्ट्रपतींनी हे संकेत युक्रेनच्या राष्ट्रपतींनी असेही संकेत दिले की,भारतासोबत चांगले संबंध राखणे दोन्ही बाजूंसाठी फायदेशीर ठरेल. त्यांनी सांगितले की आंतरराष्ट्रीय सहकार्य, विशेषतः युरोप आणि भारत यांच्यातील भागीदारी, ऊर्जा संकट आणि युद्धाशी संबंधित आव्हानांना तोंड देण्यास मदत करू शकते.

असे धक्कादायक विधान त्यांनी केले आहे.



झेलेन्स्की यांनी ऊर्जा क्षेत्रात काही समस्या आहेत, परंतु त्या सोडवता येतात हे सांगत,आपल्याकडे ऊर्जेशी संबंधित समस्या आहेत, परंतु त्या सोडवता येतात. भारत आपल्यासोबत उभा आहे आणि युरोपनेही भारतासोबत मजबूत संबंध निर्माण करावेत.असे म्हटले.

झेलेन्स्की यांनी युरोपीय देशांना हे आवाहन त्यांनी युरोपीय देशांना भारतासोबत सहकार्य आणि संबंध अधिक मजबूत करण्याचे आवाहन केले. झेलेन्स्की म्हणाले की, आपण भारतीय मित्र राष्ट्रांपासून दूर राहू नये, कारण ते या संघर्षात युक्रेनसोबत उभे आहेत. त्यांचे विधान अशा वेळी आले आहे जेव्हा रशिया आणि युक्रेनमधील युद्ध सुरु आहे आणि त्याचे परिणाम जागतिक स्तरावर जाणवत आहेत.

रशिया-युक्रेन युद्ध २०२२ मध्ये सुरू रशिया-युक्रेन युद्ध २०२२ मध्ये रशियाने युक्रेनवर आक्रमण केले तेव्हा सुरू झाले. त्यात अनेक लोक जखमी आणि मारले गेले. युरोप आणि अमेरिकेने रशियावर आर्थिक आणि ऊर्जा निर्बंध लादले. युक्रेनने आंतरराष्ट्रीय मदतीने स्वतःचा बचाव केला आणि रशिया व्यापलेल्या प्रदेशांवर नियंत्रण राखण्याचा प्रयत्न करत आहे. या युद्धाचा जगाच्या ऊर्जा, अन्न आणि अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम झाला आहे.

## औषधांवरील जीएसटी कमी झाल्याने रुग्णांना स्वस्त दरात औषधी उपलब्ध

लातूर : केंद्र सरकारने औषधींवरील जीएसटी १२ टक्क्यांवरून ५ टक्क्यांपर्यंत कमी केल्याने त्याचा देशभरातील रुग्णांना फायदा होत असून त्यांना आता स्वस्तात औषधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयाचे ऑल इंडिया केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनने स्वागत केले आहे.

संपूर्ण देशभरात साडेबारा लाखांहून अधिक औषधी विक्रेत्यांची अखिल भारतीय औषधी विक्रेता संघटना आहे. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष जगन्नाथ शिंदे, सचिव राजीव सिंघल यांनी केंद्र सरकारच्या या निर्णयाचे स्वागत करून रुग्णांना तात्काळ नवीन जीएसटी नुसार औषधी उपलब्ध करून देण्याच्या सूचना सर्व औषधी विक्रेत्यांना दिल्या आहेत. त्यांच्या निर्देशाप्रमाणे औषधी विक्रेत्यांनी संघटनेच्या ' आपले आरोग्य - आमचे वाचन ' या ब्रीदानुसार रुग्णांना स्वस्त दरात औषधी वितरित करण्याबाबत सांगण्यात आले आहे. औषधींच्या दरात कपात झाल्याची माहिती रुग्णांना मिळावी याकरिता औषधी दुकानासमोर तशा आशयाचे पोश्टर लावण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

ऑल इंडिया केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनने जुन्या स्टॉक वर मिळणाऱ्या जीएसटीचा जमा परताव्याची उचित व्यवस्था केल्यास व्यापाऱ्यांवर नगदी चलन तुटवड्याचा भार कमी होऊ शकतो, जीएसटी २. ० परिवर्तन काळात औषधी विक्रेत्यांकडून अनावधानाने काही चुका झाल्यास ३ ते ४ महिन्यापर्यंत औषधी विक्रेत्यांना संरक्षण मिळावे अशी अपेक्षा सरकारकडून व्यक्त केली आहे. नव्या कर प्रणालीमुळे अनेक औषधींच्या किमती कमी झाल्या असून कॅन्सर तसेच बहुतांश जीवनरक्षक औषधी करमुक्त करण्यात आल्या आहेत. लातूर जिल्ह्यातील सर्व औषधी विक्रेत्यांनाही नव्या जीएसटी दरानुसार रुग्णांना औषधी उपलब्ध करून देण्यात याव्यात अशा मार्गदर्शक सूचना देण्यात आल्याचे लातूर जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असो.चे अध्यक्ष रामदास भोसले यांनी सांगितले. लातूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुका स्तरावर सर्वसाधारण सभा घेऊन औषधी विक्रेत्यांना जीएसटी दराबाबत मार्गदर्शन करण्यात आल्याचेही भोसले यांनी सांगितले.

# सर्व निकष बाजूला ठेवून शेतकऱ्यांना सरसकट मदत; दिवाळीपूर्वी मदतीचे वितरण केले जाईल - मुख्यमंत्री

लातूर :-: राज्यात अनेक ठिकाणी ढगफुटी सदृश्य पाऊस झाल्याने नद्यांना पूर आला आहे. पिकांचे मोठ्या नुकसान झाले असून जमीन खरडून गेली आहे. या संकटकाळात राज्य शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून सर्व निकष बाजूला ठेवून सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट मदत केली जाईल. तसेच दिवाळीपूर्वीच ही मदत शेतकऱ्यांना वितरीत करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी औसा तालुक्यातील उजनी आणि निलंगा तालुक्यातील औराद शहाजानी येथे अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी केली. तसेच शेतकऱ्यांशी संवाद साधून नुकसानीची माहिती घेतली. जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आमदार अभिमन्यू पवार, आमदार संजय बनसोडे, आमदार रमेश कराड, आमदार राणा जगजितसिंह पाटील, आमदार कैलास पाटील, माजी आमदार बसवराज पाटीलजिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, उजनी येथे उपस्थित होते. तर औराद शहाजानी येथे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, विभागीय आयुक्त पापळकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल मीना, बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळाचे अधीक्षक अभियंता आय.एम. चिश्ती उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सर्वप्रथम औसा ते तुळजापूर महामार्गावरील पुलावरून तेरणा नदीपात्राची, नदीला आलेल्या पुरामुळे झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीची पाहणी केली. त्यानंतर उजनी गावालगत असलेल्या तेरणा नदीपात्राची व गावातील घरे, दुकानांचे पुरामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करून शेतकरी, ग्रामस्थांकडून शेतपिकांच्या नुकसानीची माहिती घेतली.

टंचाईच्या काळात लागू असलेल्या उपाययोजना अतिवृष्टीतही लागू करण्यात येतील. शेतकऱ्यांना अधिकाधिक मदत करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. अतिवृष्टीमुळे पुराचे पाणी घरात, दुकानात शिरल्याने झालेल्या नुकसानीचीही मदत देण्यात येईल. कालच (मंगळवार) राज्य शासनाने नुकसानग्रस्तांसाठी मदतीचा २ हजार २०० कोटींचा पहिला हप्ता मंजूर केला. ज्याप्रमाणे नुकसानीचे अहवाल प्राप्त होतील, त्यानुसार अधिकची मदत केली जाईल, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले. उजनी गावालगत तेरणा नदीवर औसा व तुळजापूर तालुक्याला जोडणाऱ्या पुलाची उभारणी, तसेच उजनी गाव ते राष्ट्रीय महामार्गावरील उजनी मोडला जोडणाऱ्या रस्त्याच्या कामाला मंजुरी देण्याची घोषणाही त्यांनी यावेळी केली. पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. नदीकाठच्या जमिनी खरडून गेल्याने शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक फटका बसला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना अधिकची मदत मिळावी, अशी मागणी आमदार अभिमन्यू पवार यांनी यावेळी केली. आमदार संजय बनसोडे यांनीही उदगीर, जळकोट तालुक्यात अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीच्या मदतीबाबत मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले. औराद शहाजानी येथे पूर संरक्षक भिंत उभारणार



महाराष्ट्र, कर्नाटक सीमेवर तेरणा आणि मांजरा नदीच्या संगमावर असलेल्या औराद शहाजानी येथील नुकसानग्रस्त भागाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकरी बांधवांशी संवाद साधला. शेतकरी शिवपूत्र आगरे यांनी त्यांच्या शेतात शिरलेल्या पाण्याची आणि नुकसानीची व इतर ग्रामस्थांनी मूग, उडीद, मका, सोयाबीन आदी पिकांच्या नुकसानीची माहिती मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांना दिली. यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेत शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचा विश्वास त्यांना दिला.

शेतकऱ्यांनी काळजी करू नये, शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत केली जाईल, अशी ग्वाही देखील मुख्यमंत्र्यांनी दिली. कमी कालावधीत अधिक पाऊस पडल्यामुळे नदीमध्ये येणाऱ्या पाण्यात अचानक वाढ होते, त्यामुळे पूर परिस्थिती निर्माण होते, त्यासाठी नदीवर बॅरेजसची उभारणी करून पुरावर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न करण्यात येईल. औराद शहाजानी येथील पुराचा प्रश्न सोडविण्यासाठी पूर संरक्षक भिंत बांधण्यात येईल. जुन्या बॅरेजसच्या नूतनीकरणाचा कार्यक्रम हाती घेण्यात येईल. या बॅरेजसला आधुनिक पद्धतीचे दरवाजे बसविण्यात येतील, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले. औराद येथे मांजरा व तेरणा नद्याच्या संगमामुळे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. पिकाच्या नुकसानीसह जमीन खरडून गेली आहे. मांजरा, तेरणा नदीच्या संगमामुळे नदी पात्र वाढते, म्हणून आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी काही बॅरेजेसबाबत सुचवले आहेत, त्यानुसारही कार्यवाही करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. पंचनाम्यासाठी ड्रोन, मोबाईल फोटो ग्राह्य नुकसान झालेल्या भागातील पंचनाम्याची कार्यवाही सुरू आहे. ज्या भागात पाणी शिरले अशी नोंद आहे, पण तिथे पोहचणे शक्य नाही, अशा ठिकाणी ड्रोनद्वारे करण्यात आलेल्या पंचनामाही ग्राह्य धरण्यात येईल. तसेच मोबाईलवरील फोटोही स्वीकारण्यात येतील, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले.

## संपादकीय

# पंतप्रधान मोदी यांचे आरोग्यसेवेला बळ!

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भारताचे आरोग्यसेवा धोरण हे कल्याणाच्या संकुचित कक्षा ओलांडून पुढे गेले आहे. ते आता २०४७ पर्यंत विकसित भारत उभारण्याच्या रणनीतीच्या केंद्रस्थानी आहे. आरोग्याला गुंतवणूक मानून या उपक्रमांनी दाखवून दिले आहे की, आरोग्यसेवेतील सुशासनही एक उत्तम आर्थिक धोरण आहे. ते आजारांचा भार कमी करते, कौटुंबिक बचतीचे रक्षण करते आणि मानवी भांडवल खुले करते.

गुजरातचे मुख्यमंत्री होते तेव्हापासूनच पंतप्रधान मोदी यांना आरोग्यसेवेत रस होता. त्यावेळी त्यांनी वेळेवर उपाययोजना आणि सुगम्य सेवांवर भर दिला. १०८ आपत्कालीन रुग्णवाहिका सेवेमुळे ग्रामीण आणि शहरी समुदायांना जलद वैद्यकीय मदत मिळाली, ज्यामुळे मृत्यू दर कमी झाला तसेच आजारांचे प्रमाण कमी झाले. त्याच वेळी आदिवासी आणि ग्रामीण भागातील मुलांसाठी राबवत असलेल्या पोषण या पोषणविषयक कार्यक्रमाने सूक्ष्म पोषक तत्त्वांची कमतरता दूर केली आणि यातून चांगल्या शैक्षणिक निकालांचा पाया रचला गेला. या सुरुवातीच्या प्रयोगांनी राष्ट्रीय सुधारणांना आकार देणारे तत्त्व सर्वांसमोर आणले. प्रतिबंधात्मक उपाययोजनांमधील गुंतवणूक उत्पादकता आणि समृद्धीमध्ये लाभ मिळवून देते. राष्ट्रीय नेतृत्व स्वीकारल्यानंतर मोदी यांनी या धड्यांचा अभूतपूर्व पोहोच असलेल्या कार्यक्रमांपर्यंत विस्तार केला. २०१८ मध्ये सुरू केलेली आयुष्मान भारत ही जगातील सर्वात मोठी सरकार पुरस्कृत आरोग्य विमा योजना बनली, जी ५५ कोटींहून अधिक आर्थिकदृष्ट्या कमकुवत नागरिकांना उपचार पुरवते. कुटुंबांचे भल्यामोठ्या वैद्यकीय खर्चापासून संरक्षण करून लाखो लोकांना आजारपणानंतर पुन्हा गरिबीत जाण्यापासून रोखण्यास या योजनेने मदत केली आहे. ही योजना रुग्णांना पॅनेलशी संलग्न रुग्णालयांमध्ये उपचार मिळवून देते, दर्जात्मक सुधारणांना प्रोत्साहन देते आणि दुय्यम आणि तृतीयक आरोग्यसेवांमध्ये स्पर्धात्मक व्यवस्थेला चालना देते.

२०१८ मध्ये सुरू झालेल्या पोषण अभियानाचा उद्देश गर्भवती, स्तनपान देणार्या माता आणि लहान बालकांमधील कुपोषणाची समस्या दूर करणे आहे. पूरक पोषण, वाढीचे निरीक्षण आणि वर्तणुकीत बदल अभियान एकत्रितपणे निरोगी माता आणि सुदृढ बाळांची काळजी घेते. लहान वयात चांगले पोषण मिळाल्यामुळे संज्ञानात्मक विकास आणि भविष्यातील कमाई क्षमता वाढवते. अनेक दशके उच्च उत्पादकतेत मोजमाप करता येऊ शकेल, असा हा गुंतवणुकीवरील परतावा आहे .

जनऔषधी केंद्रांमुळे औषधांच्या परवडणार्या किमतींना मोठी चालना मिळाली आहे. १६,९०० हून अधिक जनऔषधी केंद्रे मोठ्या सवलतीच्या दरात दर्जेदार जेनेरिक औषधे पुरवत असल्यामुळे कुटुंबांना महागड्या ब–ँडेड औषधांवर खर्च करावे लागणारे पैसे आता ते अन्न, शिक्षण किंवा छोट्या व्यवसायातील गुंतवणुकीसाठी वळवू शकतात. स्वच्छ भारत मिशनचा बहुतेक वेळेस स्वच्छता मोहीम या चौकटीत समावेश केला जात असला, तरी ती सार्वजनिक आरोग्य क्रांती आहे. शहरे आणि खेड्यांमध्ये बांधलेल्या लाखो स्वच्छतागृहांमुळे उघड्यावरील शौचाचे प्रमाण झपाट्याने कमी झाल्याने जलजन्य रोगांच्या संसर्गाचे प्रमाण कमी होऊन दरवर्षाला ६०,०००–७०,००० अर्भकांचे प्राण वाचल्याचा अंदाज आहे. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ'सारख्या महिलाकेंद्रित उपक्रमांनी लिंग गुणोत्तरात सुधारणा झाली असून मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळाले असताना दुसरीकडे डिजिटल आरोग्य साधने आणि आयुष्मान भारत आरोग्य केंद्रांमुळे अगदी लहानातल्या लहान वस्त्यांनाही वैद्यकीय तपासणी, दूरस्थ पद्धतीने वैद्यकीय सल्ला आणि इलेक्ट्रॉनिक आरोग्य नोंदी अशा सोयी उपलब्ध होत आहेत. या सर्व गोष्टींचा एकत्रित परिणाम म्हणजे, या उपाययोजनांमुळे मोठ्या संख्येने निरोगी नागरिक, डिस्पोजेबल उत्पन्न टिकवून ठेवणार्या कुटुंबांची परिसंस्था निर्माण झाली आहे. त्याचसोबत कार्यबल अधिक विश्वासार्ह आणि कुशल होत आहे.

युनिसेफच्या माहितीनुसार, स्वच्छ भारत मिशन चळवळीमुळे प्रत्येक ग्रामीण कुटुंबाची दर वर्षाला सुमारे ५०,००० रुपयांची बचत झाली. या सुधारणांमागील आर्थिक तर्क लक्षवेधक आहे. भारताला पूर्वीपासून खिशाला न परवडणार्या आरोग्यसेवेच्या खर्चाच्या समस्येचा सामना करावा लागत होता. २०१३–१४ मध्ये अशा एकूण खर्चात त्याचे प्रमाण ६४ टक्के होते. २०२१–२२ पर्यंत हे प्रमाण ३९ टक्क्यांपर्यंत कमी झाले. यासाठी मुख्यतः विस्तारित विमा, अनुदानित दराने पुरविली जाणारी औषधे आणि स्वच्छतेतील सुधारणा हे घटक कारणीभूत असल्याचे म्हणता येऊ शकते. आजारपणावर होणारा वैयक्तिक खर्च कमी झाल्याचे पर्यावसान कुटुंबांचे उपभोगाचे प्रमाण वाढण्यात, अधिक बचत आणि औपचारिक वित्तपुरवठ्यातील मजबूत सहभागाच्या रूपात होते. समानता आणि आर्थिक गतिमानता साध्य करण्यासाठी सरकार कशाप्रकारे सार्वजनिक धोरणाचा योग्य वापर करू शकते, हे भारताच्या आरोग्य क्षेत्रात २०१४ पासून झालेल्या परिवर्तनातून दिसून येते. आरोग्यसेवेला उत्पादकतेचा आधारस्तंभ म्हणून पुनर्स्थापित करून मोदी यांनी धर्मादायतेकडून गुंतवणुकीकडे असा मोठा बदल घडवून आणला. एकेकाळी आजारपण आणि कर्जाच्या विळख्यात अडकलेली कुटुंबे आता उत्पन्नाचा भाग राखून मुलांना शिक्षण देत आहेत आणि औपचारिक बाजारपेठेत योगदान देत आहेत. आरोग्य सुविधा आणि स्वच्छतेमुळे भक्कम पाठिंबा मिळालेल्या लाखो महिला कार्यक्षेत्र आणि सार्वजनिक जीवनात आपले स्थान निर्माण करत आहेत. देशात ३८७ वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यासाठी ६० वर्षे लागली. केवळ दहा वर्षांच्या कालखंडात ही संख्या ७८० वैद्यकीय महाविद्यालयांपर्यंत पोहोचली. तसेच २०१४ मध्ये वैद्यकीय तज्ज्ञांना प्रशिक्षण देण्यासाठी देशात २८,५०० पदव्युत्तर जागा होत्या आणि आज त्या ७५,०९२ जागा झाल्या आहेत. आज भारतात दरवर्षी १,१८,०० डॉक्टर्स तयार होतात. हे प्रमाण जगात सर्वाधिक आहे. आरोग्यसेवेचा पाया डॉक्टर्स, परिचारिका आणि पॅरामेडिक्सवर बांधला गेला आहे. आज भारत केवळ भारतासाठीच नव्हे, तर जगभर आरोग्यसेवा पुरवण्यासाठी सर्वात जास्त कुशल कामगारांची निर्मिती करतो. भारत २०४७ कडे वाटचाल करेल, तसतसे याचे लाभांश कितीतरी पटीने वाढत जातील. सर्वसमावेशक, प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा हा आता एक प्राथमिक मुद्दा राहिलेला नाही. तो राष्ट्रीय सामर्थ्याचा कणा आणि आर्थिक परिवर्तनाचे निर्णायक साधन बनला आहे.

# बनावट औषधांचा धंदा!

एका अहवालात भारतीय बाजारपेठेतील दर चार औषधांपैकी एक औषध बनावट असल्याचा दावा केला आहे. अनेक आजारांवर बनावट औषधे बाजारात उपलब्ध आहेत. वेगवेगळ्या नावांनी, देशी आणि परकी कंपन्यांच्या नावाखाली बनावट औषधांचा बाजार थाटला गेला आहे. अलीकडेच आग्रा येथे बनावट औषधांचे मोठे सिंडिकेट उघडकीस आले. या प्रकरणाचा सखोल तपास केला असता पुद्दुचेरी आणि चेन्नईत बनावट औषधांची निर्मिती करताना त्याची साठवणूक मात्र आग्रा येथे केली जात असे. तेथून चार राज्यांत त्याचा पुरवठा व्हायचा. औषध विभागाच्या पथकाने केलेल्या छापेमारीत आठ कंपन्यांची सुमारे ७१ कोटी रुपयांची औषधे जप्त करण्यात आली आणि याप्रकरणी तीन औषध विक्रेत्यांना अटक करण्यात आली. सिंडिकेटमध्ये ४० औषध विक्रेते सामील असल्याचे पुरावे सापडले आहेत. औषधांचा काळाबाजार करणार्या पंधरा डमी कंपन्यांची ओळख पटली आहे. त्यांच्या नावावर अनेक राज्यांत बाजार केला जात होता. औषधाची मागणी आणि पुरवठा करण्यासाठी माफियांकडून रेल्वेसेवेचा वापर केला जात होता. मागील वर्षी आग्रा येथे शास्त्रीपुरम येथे जनावरांची बनावट औषध तयार करणारा कारखाना पकडला होता.



बनावट औषधांचा व्यापार करणार्यांचे जाळे संपूर्ण देशभरात पसरलेले आहे. मनुष्यप्राणीच नाही तर प्राण्यांसाठी वापरली जाणारी औषधेही बनावट स्वरूपात बाजारात आणली जात आहेत. या काळाबाजारात वरपासून ते खालपर्यंतचे विविध स्तरांवर मिलीभगत दिसून येते. १९६९ पासून कार्यरत असलेल्या, देशातील सर्वात मोठा औषधांचा ठोक व्यापार करणार्या भागीरथी पॅलेसवर दिल्लीच्या औषधी नियंत्रण विभाग आणि पोलिसांनी गेल्या तीन वर्षांत अनेकदा छापे घातले. तेथे १४ कोटी रुपयांपेक्षा अधिक बनावट औषधांचा साठा पकडण्यात आला आहे. यात बहुतांश बनावट औषधे कर्करोग, हृदयविकार, मूत्रपिंड, मधुमेह आणि स्नायूच्या रोगांसंबंधीची होती आणि त्यांची औषधे नामांकित ब्रँडच्या नावाखाली विकली जात होती. विशेष म्हणजे बनावट औषधांचे पॅकेजिंग, बारकोड–क्युआर कोड हे मूळ औषधांसारखेच असल्याने खरेदीदारदेखील डोळे झाकून त्याची खरेदी करतात. परिणामी रुग्णांची तब्येत सुधारण्याची चिन्हे दिसत नाहीत.

जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, जगातील बनावट औषधांचा काळाबाजार १६ लाख ६० हजार कोटी रुपयांचा आहे. बनावट औषधांपैकी ६७ टक्के औषधांमुळे लोकांचा जीव धोक्यात असल्याचे सांगितले जाते. उर्वरित औषधे धोकादायक नसली तरी त्यात बरेचदा आजारपण बरा करणारा घटक पदार्थ नसतो आणि त्यामुळे रुग्ण लवकर बरा होत नाही. शेवटी त्याची तब्येत ढासळत जाते आणि तो मृत्यूच्या दाढेत ओढला जातो. बनावट किंवा निकृष्ट दर्जाच्या औषधांच्या आयात आणि निर्यातीच्या आघाडीवर भारत चौथ्या क्रमाकांवर आहे. 'असोचेम'च्या एका अभ्यासानुसार, भारतात २५ टक्के औषधे ही बनावट किंवा निकृष्ट असतात. भारतीय बाजारातील त्यांची उलाढाल सुमारे ३५२ कोटी रुपयांची आहे.

२०२४ मध्ये तेलंगणात कोट्यवधींची बनावट औषधे किंवा निकृष्ट दर्जाच्या औषधांचा साठा पकडला होता. तेलंगण औषध नियंत्रण प्रशासनाच्या तपासात नामांकित कंपन्यांच्या नावाने विकल्या जाणार्या या औषधात खडूची पावडर किंवा स्टार्चचे मिश्रण केल्याचे निदर्शनास आले. याप्रमाणे कॅप्सूल ॲमोक्सिलिनची असेल तर त्यात स्वस्तातील औषध पॅरासिटीमॉल भरलेले आढळून आले. यानुसार औषधात ५०० ग्रॅम ॲमोक्सिलीन साल्टचे प्रमाण आवश्यक असताना तेथे केवळ ५० ग्राम साल्ट होते. अशावेळी रुग्ण कसा बरा होणार. कर्करोगाचे देखील बनावट औषधे पकडण्यात येत आहेत. ही सर्व औषधी उत्तराखंडच्या काशीपूर आणि उत्तर प्रदेशातील गाझियाबादहून कुरियरमार्फत तेलंगणात पोचवली जात होती. या औषधाचे पॅकेजिंग खर्या औषधांप्रमाणे करण्यात आले आणि त्यामुळे औषधांचा फरक करणे कठीण जात होते.

उत्तराखंडच्या औषधी नियंत्रण विभागाच्या तपासात गेल्यावर्षी अनेक औषध कंपन्यांचे नमुने अपात्र ठरल्याने त्यांचे परवाने रद्द करण्यात आले होते. हे सर्व औषधे उत्तराखंडमध्ये तयार केले जात होते. याप्रमाणे उत्तर प्रदेशमधील आग्राच्या महंमदपूर येथे २०२४ मध्ये बनावट औषध तयार करणारा कारखाना पकडला. पोलिसांनी तेथे ८० कोटी रुपयांची बनावट औषधे जप्त केली. यात कर्करोग, मधुमेह, ॲलर्जी, स्लिपिंग पिल्स आणि ॲंटिबायोटिक्स औषधांचा समावेश होता. याप्रमाणे देशातील अनेक राज्यांत छापेमारी करत बनावट औषधांचा मोठा साठा पकडण्यात आला होता. यापूर्वी करोना काळात देशभरात बनावट रेमडेसिव्हिर इंजेक्शनचा पुरवठा करण्याचे प्रकरणेही घडली आहेत.

दिल्ली पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण विभागाने अनेक मोहिमांतून गेल्या वर्षभरात दिल्ली–एनसीआरमध्ये अनेक सिंडिकेटचा भांडाफोड केला आहे. गाझियाबादच्या लोनी येथील ट्रोनिका सिटी येथे बनावट औषधांचा साठा पकडला आणि त्याचा मास्टरमाइंड डॉक्टरच निघाला. सोनीपतच्या गन्नौर येथील कारखान्यात भारत, अमेरिका, ब्रिटन, बांगलादेश आणि श्रीलंकेतील सात मोठ्या कंपन्यांचे वीसपेक्षा अधिक ब्रँडची बनावट औषधी तयार केली जात होती. इंडिया मार्ट आणि भागीरथ प्लेसपर्यंत त्यांचा पुरवठा सुरळीत सुरू असायचा. भारताशिवाय चीन, बांगलादेश, नेपाळमध्ये देखील या बनावट औषधांची निर्यात केली जात असे.

काही औषधे गरजेपेक्षा अधिक प्रमाणात प्राशन केल्यास त्यातून धुंदी येऊ शकते. मद्य किंवा अमली पदार्थाच्या तुलनेत या औषधांचे सेवन स्वस्त असल्याने काही जण त्याचा वापर करतात. या कारणामुळे कफ सिरप, पेन किलर्स, डिप्रेशन पिल्स आणि मनोरुग्णाला देण्यात येणार्या इंजेक्शनची विक्री वाढत आहे. त्याचा लाभ काही कंपन्यांदेखील घेत आहेत. एकाच परवान्यावर अनेक कारखाने सुरू करत त्याची बिनधास्त निर्मिती केली जात आहे. डिप्रेशनच्या उपचारासाठी देण्यात येणारी गोळी आजकाल रेव्ह पार्टीत बर्यापैकी वापरली जाते.

आग्रा येथे औषधांच्या माफियांनी ब्रँडेड कंपन्यांच्या औषधांच्या सुरक्षा पडताळणीवरच डल्ला मारला. आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या मदतीने बनावट क्युआर कोड तयार केले. एवढेच नाही तर कंपनीच्या एकाच बॅच नंबरने हजारपट औषधांची निर्मिती करून ती बाजारात आणली. पण या व्यवहारात एकच बिल सतत दाखविले जात असल्याने चोरी उघड झाली. नामांकित कंपनीला जेव्हा उत्पादनापेक्षा अधिक औषधे बाजारात दिसू लागली तेव्हा त्यांनी विभागाकडे तक्रार केली. तीन–चार महिने त्यावर पाळत ठेवली गेली आणि पुरावे हाती लागल्यानंतर छापेमारी करण्यात आली. खर्या औषधांच्या आड खोट्या औषधांचा बाजार वाढत आहे. प्रथमदर्शनी ही औषधी खर्या औषधांप्रमाणे भासतात. मात्र बनावट औषधांत वेगवेगळे घटक वापरून त्यावर खर्या कंपन्यांचे लेबल लावून लोकांच्या माथी मारली जातात.

# जीएसटी कपातीचे स्वागतच;यामुळे खरोखरच महागाई कमी होईल का?शेतकरी,गरीब व सर्वसामान्यांना दिलासा मिळेल का?

सरकार अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेत आहेत त्यात मुख्यत्वे करून जीएसटी कमी केल्याने अनेकांना लाभ अवश्य होईल यात दुमत नाही.परंतु जीएसटी सरकारनेच लावली होती आणि आता ती कमी केली म्हणजे काय केले? सर्वप्रथम जीएसटच्या माध्यमातून सरकारची तिजोरी भरली ही बाब ठीक आहे आणि आता जीएसट कमी केली म्हणजे महागाई कमी झाली किंवा सर्वसामान्यांचे जगणे सुसह्य झाले म्हणता येणार नाही. कारण जीएसटीचा संपूर्ण पैसा हा जनतेच्या खिशातून जात असतो. देशाच्या १४० कोटी जनतेला खरोखरच दिलासा द्यायचा असेल व जीवन सुसह्य करायचे असेल तर सर्वप्रथम केंद्र सरकारने व राज्य सरकारांनी महागाई कमी करने अत्यंत गरजेचे आहे.कारण देशात महागाई भस्मासुर दिवसेंदिवस वाढत आहे व यावर तोंडाला पाने पुसण्याचे काम अल्पसा पगार डीए (महागाई भत्ता) यामाध्यमातून वाढवून सरकारी कर्मचाऱ्यांकडुन सरकार आपली पाठ थोपटून घेते.याचा आयता फायदा राजकीय पुढाऱ्यांच्या पगारामध्ये व पेंशनमध्ये होतो.परंतु व्यापारीवर्ग व पुंजीपतीवर्ग महागाई वाढवून सरकारची नेहमीच दिशाभूल करीत असतो व याचा लाभ कर्मचाऱ्यांना न होता व्यापाऱ्यांना मोठ्या प्रमाणात होत असतो. याचे प्रायश्चित्त देशातील सर्वसामान्य,गरीब, शेतकरी,मोलमजुर यांना महागाईच्या रूपात नेहमीच भोगावे लागते आणि याची झळ आरोग्य,शिक्षण व जीवनावश्यक वस्तूंवर पडून याचे प्रायश्चित्त संपूर्ण कुटुंबाला वेगवेगळ्या रूपात भोगावी लागते. देशातील कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात जर १ टक्क्याने वाढ झाली असेल तर त्याचा व्यापारी वर्ग मोठ्या प्रमाणात फायदा घेऊन संपूर्ण भारतामध्ये सर्वच वस्तूंवर २० टक्क्यांनी वाढ करतात.याचे प्रायश्चित्त शेतकऱ्यांसह सर्वसामान्यांना भोगावे लागते. कारण सरकारी कर्मचाऱ्यांची डीए वाढ सुध्दा नाहीच्या बरोबरीने असते. परंतु शेतकऱ्यांना व सर्वसामान्यांना याचा काहीच लाभ होत नाही हेही तितकेच सत्य आहे.त्यामुळे सरकारने महागाई कमी करण्यावर जास्तीत जास्त भर दिला पाहिजे.एकतर देशातील ९५ टक्के मुठभर आजी–माजी राजकीय पुढाऱ्यांनी देशाचे वाटोळे करून करोडो रुपयांची मोठ्या प्रमाणात चलअचल संपत्ती डांबुन ठेवल्याने देशात महागाई, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, बेरोजगारी व शैक्षणिक समस्या इत्यादी अनेक समस्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे.तर दुसरीकडे देशातील भरमसाठ महागाई वाढल्याने याचे प्रायचिश्चित्त देशाची १४० कोटी जनतेला भोगावे लागते.त्यामुळे जीएसटीत कपात करून खुप काही मोठी कामगिरी केली असे म्हणता येणार नाही व जीएसटी बचत महोत्सव सुध्दा म्हणता येणार नाही. देशातील राजकीय पुढारी जोपर्यंत सर्वसामान्यांनप्रमाणे वागणार नाही आणि रहाणार नाही तोपर्यंत देशाचा पायाभूत विकास संभव नाही. त्यामुळे सरकारने सर्वप्रथम आजी–माजी राजकीय पुढाऱ्यांच्या मुसक्या आवळल्या पाहिजे, त्यांच्या संपत्तीवर टाच ठेवायला पाहिजे.तेव्हाच देश सुजलाम सुफलाम होईल.तेव्हाच खरा बचत महोत्सव म्हणावा लागेल व जनता सुध्दा त्याचे मनापासून स्वागत करेल. काही ठिकाणी सुधारणा होण्याची सुध्दा गरज आहे. कारण सरकारने सर्वप्रथम जीएसटी दर वाढविले आणि आता कमी केले यामुळे गरिब व सर्वसामान्यांना काय फायदा? यांचाही राजकीय पुढाऱ्यांनी व सरकारने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.



सरकारने जीएसटी दर जर संतुलित ठेवला असता तर आज महागाईवर आपोआप नियंत्रण ठेवता आले असते.त्यामुळे आता जीएसटीमध्ये कपात करून महागाई कमी होईल असे मला वाटत नाही.आता जीएसटी महोत्सव आणि अगोदर जीएसटी वसुल केली त्याला कोणता महोत्सव म्हणावे! असाही प्रश्न सर्वसामान्यांनपुढे उपस्थित होतो.त्यामुळे हा महोत्सव नसुन प्रथम जास्त वसुल करने व नंतर त्याच्यात कमी करून स्वतःची पाठ थोपटने असेच म्हणावे लागेल. माननीय प्रधानमंत्री म्हणतात की, मी स्वदेशी खरेदी करतो, मी स्वदेशी विकतो ही भावना प्रत्येक देशवासीयांच्या मनात रूजली पाहिजे,तरच विकासाला गती मिळेल.राज्य सरकारांनी आत्मनिर्भर भारतआणि स्वदेशी मोहिमांना पाठबळ द्यावे.या वक्तव्याचे मनापासून स्वागतच आणि असेच व्हायला सुध्दा पाहिजे.देशात स्वदेशीचा नारा हा १९४७ पासुनच होता. परंतु पुंजीपतीवर्गांनी, हायप्रोफाइलमध्ये रहाणारे व राजकीय पुढारी यांनीच स्वदेशीच्या नाऱ्याला तिलांजली दिली व महागड्या विदेशी वस्तू खरेदी करण्यास सुरुवात केली व यावर जास्तीत जास्त भर दिला याला काय म्हणावे!आता आपण २१ व्या शतकात वावरत आहोत स्वदेशीचा वापर आपण जेव्हा म्हणतो तेव्हा याची सुरुवात देशातील आजी–माजी संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांपासुनच व्हायला पाहिजे.कारण देशातील प्रत्येक पक्ष–विपक्षाचे राजकीय पुढारी १४० कोटी जनतेला भाषणामध्ये ग्यान वाटत असतात.देशातील प्रत्येक राजकीय पुढाऱ्यांनी दर महिन्याला जाहीर करायला पाहिजे की मी आणि माझ्या परिवारातील सदस्यांनी व कुटुंबीयांनी या–या विदेशी वस्तूंचा त्याग केला व स्वदेशी वस्तूंचा वापर करायला सुरुवात केली आणि असे सांगायला विसरू नये की पुढे चालून कोणत्याही विदेशी वस्तूंचा वापर करणार नाही तेव्हाच स्वदेशी खरेदी–विक्रीला महत्व येईल व खऱ्या अर्थाने देशाची वाटचाल आत्मनिर्भर भारत होण्याच्या दिशेने वाटचाल करेल.कारण यामुळे देशातील स्वदेशीच्या वस्तूंना चालना मिळण्यास मोठी मदत होईल.आज देशातील शेतकऱ्यांच्या समस्या, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां, बेरोजगारी, महागाई, महागडे शिक्षण,आरोग्य सुविधांच्या समस्या याला जबाबदार देशातील ९५ टक्के राजकीय पुढारीच आहे.आज देशातील १४० कोटी जनतेला कशाची आवश्यकता असेल तर फक्त आरोग्य व शिक्षण सुविधांची,सरकारला आरोग्याच्या दृष्टीकोनातून किंवा शिक्षणाच्या दृष्टीकोनातून कोणत्याही नवीन योजना आणण्याची गरज नाही. सरकारने जर आरोग्य सुविधा आणि शिक्षण सुविधा मोफत जर केले तर देशाची १४० कोटी जनता सरकारचे व राजकीय पुढाऱ्यांचे आभारी राहील.परंतु तसे होत नाही.कारण देशात सर्वात जास्त खाजगी दवाखाने व शैक्षणिक संस्था ह्या राजकीय पुढाऱ्यांच्या किंवा पुंजीपती लोकांच्या आहेत.जय हिंद.

***********

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर

# आता महाबोधी बुद्ध विहाराचा ताबा कोणाकडे..?

सद्या महाबोधी महाविहार, बुद्धगया–बिहार राज्यात जागतिक पातळीवर बुद्धविहार मुक्ती आंदोलन सुरु असून तिथे बी टी ॲक्ट १९४९ (इढ–र्ली १९४९) हा कायदा रद्द करुन बुद्ध विहार बौद्धाचे ताब्यात द्यावे. असा घोषा सुरु आहे. या कायद्याने ४ ब्राह्मण हिंदू –४ बौद्ध आणि १ कलेक्टर तो ही ब्राह्मण अशी प्रशासकीय व्यवस्था आहे. मात्र बी टी ॲक्ट म्हणजे बुद्ध मंदिर कायदा याला बुद्धिस्ट टेम्पल कायदा म्हणतात. आणि टेम्पल याचा अर्थ मंदिर असा होतो. यामुळेच तिथे मिश्र संस्कृती (हिंदू परंपरा +बुद्ध संस्कृती ) यांची जोपासना करण्यात येत असते. परंतु या प्रकरणात बुद्धसंस्कृतीची जोपासना योग्य प्रमाणात होत नसल्याचे दिसून आल्याचे कारणही इथे मुळातच बुद्धानुयायी ? जे बुद्धानुयायी होते, आहेत ते कोण हे सांगणे जरा कठीणच. मात्र त्या ठिकाणाला जगभरातून अनेक बौद्ध राष्ट्र यांचे कडून दानपारमिता येते किंवा मिळते. या मिळणाऱ्या आर्थिक बाबी त्याद्वारे भारतात बौद्धधम्मास पूरक कार्य करण्याचा अभावच दिसून येतो या प्रश्नाकडे कुणाचेही ध्यान गेल्याचे उघडपणे दिसले नाही. ते आज आंदोलनकर्त्याकडून या निमित्ताने उघड होतंय. असे जरी असले तरी आता बुद्ध मंदिर ॲक्ट १९४९ हे मंदिर नाही, जे आजपर्यँत तिथे जे जे घडवीत आले, आहात ते मंदिर यानुसारच हिंदू संकल्पनेच्या शब्दप्रयोगात मोडते, म्हणूनच हिंदूचे वर्चस्वाखाली ते करीत आलात, ते यापुढील काळात



घडू द्यायचे नाही. त्यास विहार असे म्हटले पाहिजे. याच मुद्याकडे लक्ष गेले पाहिजे. बुद्ध विहार असाच त्याचा उच्चार करुन मंदिर शब्द प्रयोग टाळावा किंवा दुरुस्ती करावी. तरच जेणेकरून बौध्द धम्मीयांस शुद्ध अनुभूती घेता येईल. हा प्रमुख मुद्दा असावा. सविनय नमो बुद्धाय क्रांतिकारी जयभीम..!

*******

– मधुकर मोहिते. नवी मुंबई
२० सप्टेंबर २०२५.

# उशीर होण्याआधी वेळीच ओळखा बालकांमधील दृष्टिदोष

पुणे : अलीकडील काही वर्षांमध्ये बालकांच्या डोळ्यांशी संबंधित तक्रारींमध्ये चिंताजनक वाढ लक्षात येत आहे. 'ऑर्बिस'च्या २०२० च्या अहवालानुसार, भारतात शून्य ते १५ वर्षे वयोगटातील अंदाजे १ हजारांपैकी १ मूल अंध आहे. भारतासारख्या एका देशात अंध मुलांची ही सर्वात मोठी संख्या आहे. आजच्या डिजिटल युगात मुले तासन्तास वेळ हा पुस्तके, इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि स्क्रीन यांच्यासोबत घालवतात. पालकही त्यांचा अभ्यास, खाणेपिणे व शारीरिक वाढीकडे लक्ष देतात, मात्र यामध्ये त्यांच्या आरोग्याचा महत्त्वाचा भाग असलेल्या 'डोळे' या अवयवाकडे सोईस्कररीत्या दुर्लक्षित होते.

लवकर दिसणारी मात्र दुर्लक्षित होणारी लक्षणे

मुलांकडून वारंवार डोळे चोळणे, टीव्ही पाहताना किंवा वाचन करताना डोळे बारीक करणे, डोके वाकवणे किंवा एक डोळा झाकणे ही तशी पाहता सामान्य वाटणारी लक्षणे खरेतर तुमच्या मुलांमध्ये दृष्टिदोष असल्याची चिन्हे असू शकतात. स्क्रीनच्या जवळ बसणे, वारंवार पापण्यांची उघडझाप करणे, जवळचे काम टाळणे, फळ्यावरून पाहून लिहिताना चुका करणे किंवा ते करताना त्रास होणे ही देखील न ओळखलेल्या डोळ्यांच्या समस्या असू शकतात. पालकांना मुलांचे हे वागणे किंवा लक्षणे यांना थकवा, आळशीपणा किंवा लक्ष न देणे याचे लेबल लावतात. परंतु प्रत्यक्षात हे डोळ्यांची समस्या असल्याचा लवकर मिळणारा इशारा असू शकतो.

मुलांमध्ये सर्वसाधारणपणे आढळणाऱ्या डोळ्यांच्या समस्या

डोळ्यांचा अपवर्तन दोष (रिफ्रॅक्टिव्ह एरर) जसे 'मायोपिया' (दूरच्या वस्तू अस्पष्ट किंवा धूसर दिसणारा दूरदृष्टीदोष) झपाट्याने वाढत आहे. 'मायोपिया'मध्ये जवळची वस्तू स्पष्ट तर दूरची वस्तू अस्पष्ट दिसते. मैदानी खेळांचे कमी झालेले प्रमाण, घरातील उपक्रमांचे वाढते प्रमाण व दीर्घकाळ स्क्रीनसमोर वेळ घालवणे हे या डोळ्यांच्या दृष्टीदोशांशी संबंधित आहे. तिरळेपणा ही अजून एक सामान्य समस्या असून यामध्ये डोळे एकमेकांच्या तुलनेत सरळ दिसत नाहीत. ते कधी स्पष्ट तर कधी सौम्य स्वरूपात जाणवते. दुसरी समस्या म्हणजे 'ॲम्ब्लायोपिया' ज्याला आळशी डोळा (लेझी आय) असेही म्हणतात. यामध्ये एक डोळ्याची दृष्टी सामान्य असते तर दुसऱ्या डोळ्याची दृष्टी कमी प्रमाणात असते. हा विकार फक्त एका डोळ्यात असल्यास तो अनेकदा दुर्लक्षित होतो. याशिवाय, शहरी भागात 'ॲलर्जिक कंजंक्टिव्हायटिस' देखील वाढत आहे. थोडक्यात जास्त स्क्रीनच्या वापरामुळे डिजिटल डोळ्यांचा ताण (डिजिटल आय स्ट्रेन) ही नवी समस्या झाली आहे. अभ्यास सांगतो की २०५० पर्यंत जगातील जवळजवळ अर्धी लोकसंख्या 'मायोपिया'ने प्रभावित होऊ शकते.

डोळ्यांच्या समस्या दुर्लक्षित केल्याचा धोका

अभ्यास करताना तसेच वाचन, लेखन व एकाग्रता यामध्ये मुले मागे राहतात व शाळेत त्याचे लक्ष कमी होते. कमी दृष्टीमुळे समाजात वावरतानाचा आत्मविश्वास घटतो. तसेच एकटेपणा येतो, खेळांमध्येही



सहभाग कमी होतो. वर्तनात्मकदृष्ट्या त्यांच्यामध्ये चिडचिड होते व निराशा दिसून येते. यामुळे मुलांना चुकीने आळशी किंवा लक्ष न देणारे असे लेबल लावले जाण्याचा धोका असतो. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे दृष्टी ही मेंदुविषयक (न्यूरोलॉजिकल) वाढीशी संबंधित असल्याने मुलांच्या डोळ्यांच्या विकारांकडे वेळेत लक्ष न दिल्यास मेंदूच्या विकासावरही त्याचा परिणाम होऊ शकतो.

मुलांचे डोळे कधी तपासावेत?

जर मूल प्रिमॅच्युअर म्हणजे वेळेआधी जन्मले असेल तर लगेचच तपासावेत. तसेच, डोळ्यांच्या आजारांचा कौटुंबिक इतिहास असेल किंवा डोळ्यात पांढरा पडदा दिसत असेल तरी तपासावेत. मुल सहा महिन्यांचे झाल्यावर त्याच्यामध्ये विकासात्मक विलंब, तिरळेपणा किंवा डोळ्यांना डोळे थेट भिडवत नसेल तर नेत्ररोगतज्ज्ञाचा सल्ला घ्यावा. तीन ते पाच वर्षांच्या वयोगटात लक्षणे नसली तरी प्रत्येक मुलाने संपूर्ण डोळ्यांची तपासणी करून घ्यावी. हा वयोगट दृष्टी विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.

पालकांनी घरी काय करावे?

मुलांचे डोळे सुरक्षित ठेवणे हे अवघड काम नाही. त्यासाठी २०-२०-२० हा नियम अवलंब करावा. म्हणजे प्रत्येक २० मिनिटांच्या स्क्रीन टाइमनंतर, २० सेकंद २० फूट दूरच्या वस्तूकडे पाहावे. २ वर्षांखालील मुलांना स्क्रीन टाळावी. २ ते ५ वयाच्या मुलांसाठी दिवसाला जास्तीत जास्त १ तास स्क्रीन, तर मोठ्या मुलांसाठी २ तासांपेक्षा जास्त स्क्रीन पाहायला देऊ नका.

मुलांमधील डोळ्यांच्या बाबत छोटी - छोटी लक्षणे ओळखून, त्यांच्यामध्ये निरोगी सवयी जोपासून आणि नियमित नेत्रतपासणीला प्राधान्य देऊन पालक आपल्या मुलांना केवळ स्वच्छ दृष्टीच नव्हे तर अभ्यास, खेळ व दैनंदिन जीवनातही प्रगती करण्यास मदत करू शकतात. शेवटी, आजचे निरोगी डोळे म्हणजे उद्याचे उज्वल, स्वच्छ भविष्य आहे.

## साधा, सोपा अन् पारंपरिक घरी बनवा आगरी कोळी स्टाईल नारळी भात! गणेशाच्या नैवेद्यात एकदा नक्की ट्राय करा ही रेसिपी



भात हा एक असा पदार्थ आहे जो कसाही बनवला तरी चवीला चविष्टच लागतो. समुद्रकिनारी राहणाऱ्या आगरी-कोळी समाजाच्या जेवणात मासे, तांदूळ आणि नारळ हे त्रिसूत्री घटक कायमचे दिसतात. समुद्राच्या लाटांसारखे मनमोकळे जीवन जगणारे हे लोक साधे, झटपट पण चविष्ट पदार्थ बनवतात. त्यात नारळी भाताला एक विशेष मान मिळतो. नारळी भात चवीला साधा पण चविष्ट असा लागतो. बाप्पाचे आगमन झाले आहे अशात गणपतीच्या नैवेद्यात तुम्ही नारळी भाताचा समावेश करू शकता.

सण-उत्सव, श्रावण-भाद्रपदातील नारळी पौर्णिमा किंवा खास पाहुण्यांच्या आदरातिथ्यासाठी हा भात बनवला जातो. साध्या तांदळात किसलेला गोडसर नारळ, साजूक तूप, सुगंधी मसाले हे सर्व मिळून नारळी भात अप्रतिम लागतो. गोडसर आणि मसालेदार अशी आगरी-कोळी पद्धती ही खासियत आहे. हा भात चवदार असून पोटभरीचा आहे. सणासुदीच्या वातावरणात कुटुंबीय एकत्र बसून गरमागरम नारळी भाताचा आस्वाद घेण्यात वेगळेच सुख आहे. चला तर मग जाणून घेऊया यासाठी लागणारे साहित्य आणि कृती.

साहित्य :

२ कप तांदूळ
१ कप ताजा नारळ किस
३ टेबलस्पून साजूक तूप
४-५ लवंगा
१ छोटा दालचिनी तुकडा
१ तमालपत्र
८-१० काजू (तुपात परतलेले)
मीठ - चिमूटभर
४ कप पाणी

रात्रीच्या जेवणाला बनवा गरमा गरम आणि पोटभरणीचा मसालेदार 'सोया पुलाव'; वरून घाला तुपाची धार अन् रंगतदार करा मेजवानी

कृती :

यासाठी सर्वप्रथम तांदूळ स्वच्छ धुऊन २० मिनिटे पाण्यात भिजत ठेवा.

एका भांड्यात साजूक तूप गरम करून त्यात तमालपत्र, लवंग, दालचिनी घालून फोडणी द्या.

आता त्यात नारळाचा किस हलक्या आचेवर काही मिनिटे परतून घ्या.

आता यात भिजवलेला तांदूळ आणि चवीनुसार मीठ टाकून सर्व साहित्य नीट एकत्रित करा.

आता शिजलेला तांदूळ आणि नारळ-गुळाचे मिश्रण हलक्या हाताने मिसळा आणि यात ४ कप पाणी घाला.

शेवटी यावर झाकण ठेवून मंद आचेवर १५ मिनिटे भात छान शिजवून घ्या.

भातावर तुपात परतलेले काजू-मनुका घाला आणि तयार भात एक प्लेटमध्ये खाण्यासाठी सर्व्ह करा.

F-Qs (संबंधित प्रश्न)

नारळी भात म्हणजे काय?

नारळी भात हा ताज खोबरं आणि तांदूळ वापरून बनवलेला एक भाताचा पदार्थ आहे, हा चवीला साधा पण चविष्ट असा लागतो.

नारळी भात कोणत्या सणांना बनवतात? हा भात विशेषतः नारळी पौर्णिमा किंवा श्रावण पौर्णिमा या सणांच्या वेळी बनवला जातो.

## गणेश उत्सवात बाप्पाच्या प्रसादासाठी झटपट बनवा बेसन हलवा, झटपट तयार होईल पदार्थ

संपूर्ण देशभरात सगळीकडे गणपती बाप्पाचे मोठे जलौषात आगमन झाले. १० दिवस राज्यातील सर्वच भागांमध्ये मोठा जल्लोष आणि आनंद असतो. बाप्पाच्या प्रसादासाठी घरात अनेक वेगवेगळे पदार्थ बनवले जातात. कधी गुलाबजाम तर कधी बुंदीचे लाडू, शिरा, मोदक इत्यादी अनेक वेगवेगळे पदार्थ बनवले जातात. पण आज आम्ही तुम्हाला सोप्या पद्धतीमध्ये बेसन हलवा बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. बेसन हलवा कमीत कमी साहित्यामध्ये झटपट तयार होतो. १० दिवसांच्या उत्सव काळात सगळीकडे एक वेगळाच आनंद असतो. सर्वच घरांमधून आरती आणि भजनाचे सूर ऐकू येतात. घरी आरतीसाठी आलेल्या पाहुण्यांना प्रसाद म्हणून नेमकं काय द्यावं, हा प्रश्न पडल्यानंतर तुम्ही लगेच प्रसादासाठी बेसन हलवा बनवू शकता. चला तर जाणून घेऊया बेसन हलवा बनवण्याची सोपी रेसिपी.



साहित्य:

बेसन
सुका मेवा
तूप
साखर
वेलची पावडर
केशर

कृती:

बेसन हलवा बनवण्यासाठी सर्वप्रथम, टोपात पाणी गरम करण्यासाठी ठेवा. पाणी गरम झाल्यानंतर त्यात साखर टाकून व्यवस्थित उकळवून घ्या.

कढईमध्ये तूप गरम करण्यासाठी ठेवा. तूप गरम झाल्यानंतर त्यात बेसन टाकून मंद आचेवर भाजून घ्या.

बेसन भाजताना गॅस अजिबात फास्ट करू नये, यामुळे बेसन जळण्याची शक्यता असते. याशिवाय पदार्थाची चव सुद्धा खराब होते. बेसन व्यवस्थित भाजून झाल्यानंतर त्यात तयार केलेला साखरेचा पाक घालून मिक्स करा. त्यानंतर चमच्याने सतत मिक्स करत रहा.

त्यानंतर त्यात भाजून घेतलेला सुका मेवा आणि केशर काड्या टाकून मिक्स करा.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेला बेसन हलवा. हा पदार्थ सगळ्यांचं खूप जास्त आवडेल.

## स्वयंपाक घरातील 'या' पांढऱ्या पदार्थामुळे शरीरात वाढतो मधुमेह- कोलेस्ट्रॉचा धोका, कोणत्याही क्षणी येईल हार्ट अटॅक



चुकीची जीवनशैली फॉलो केल्यामुळे आरोग्याला हानी पोहचते. दैनंदिन आहारात खाल्लेल्या पदार्थांचा आरोग्यावर लगेच परिणाम दिसून येतो. त्यामुळे आहारात कायमच सहज पचन होणाऱ्या पदार्थांचे सेवन करावे. पण सतत जंक फूड, मद्यपान किंवा पोषक घटकांच्या कमतरतेमुळे शरीराला हानी पोहचते. आपल्यातील अनेकांना सकाळी उठल्यानंतर चहा पिण्याची सवय असते. पण उपाशी पोटी चहा कॉफीचे सेवन केल्यामुळे शरीरात ॲसिडिटी वाढते आणि कायमच अपचनाची समस्या उद्भवते. आहारात साखरेचे मोठ्या प्रमाणावर सेवन केले जाते. सतत चहा कॉफी किंवा इतर गोड पदार्थ खाल्यामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण वाढते आणि मधुमेह होतो.

दैनंदिन आहारात तिखट तेलकट पदार्थांचे सेवन आणि मानसिक ताण घेतल्यामुळे कोलेस्ट्रॉल वाढते. शरीरात वाढलेल्या कोलेस्ट्रॉलाकडे सतत दुर्लक्ष केल्यामुळे हार्ट ब्लॉकेज किंवा कोणत्याही क्षणी हार्ट अटॅक येण्याची जास्त शक्यता असते. त्यामुळे आहारात सहज पचन होणाऱ्या पदार्थांचे सेवन करावे. आज आम्ही तुम्हाला अतिप्रमाणात साखर खाल्यामुळे आरोग्यावर नेमके कोणते गंभीर परिणाम दिसून येतात, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. आहारात अतिशय कमी प्रमाणात साखर खावी.


सूज आणि इन्फ्लेमेशन वाढते: रोजच्या आहारात अतिप्रमाणात साखरेचे सेवन केल्यामुळे शरीराच्या कोणत्याही अवयवाला सूज येण्याची जास्त शक्यता असते. साखर सूज वाढण्याच्या प्रक्रियेला चालना देते. जास्त गोड पदार्थांचे सेवन केल्यामुळे ब्लड व्हेसल्सच्या भिंतींवर अतिरिक्त तणाव निर्माण होतो. याशिवाय रक्तवाहिन्या अतिशय कमकुवत होऊन जातात. हृदयाच्या रक्तवाहिन्यांमध्ये अडथळे निर्माण झाल्यानंतर शरीराला हानी पोहचते. याशिवाय काहीवेळा अचानक छातीत वेदना होणे, हार्ट ब्लॉकेजची समस्या उद्भवते.

रक्तदाब असंतुलित होतो: सतत गोड पदार्थांचे किंवा साखरेचे सेवन केल्यामुळे शरीरात उच्च रक्तदाबाची समस्या निर्माण होते. रक्तदाब असंतुलित होतो. रक्तदाब वाढल्यानंतर हृदयावर जास्तीचा तणाव निर्माण होतो. याशिवाय हृदय कमकुवत होऊन जाते. रक्तदाब कमी झाल्यानंतर हृदय कमजोर होणे किंवा हार्ट अटॅक संबंधित समस्या उद्भवतात. त्यामुळे गोड पदार्थ खाण्यावर नियंत्रण ठेवावे.

कोलेस्ट्रॉल वाढते: शरीरात उच्च कोलेस्ट्रॉल वाढणे आरोग्यासाठी अतिशय धोकादायक आहे. आहारात सतत तिखट किंवा तेलकट, गोड पदार्थांचे अतिसेवन केल्यामुळे कोलेस्ट्रॉल वाढते. उच्च कोलेस्ट्रॉल रक्तवाहिन्यांमध्ये जमा झाल्यानंतर रक्तप्रवाहात अडथळे निर्माण होतात. त्यामुळे हार्ट अटॅक किंवा हार्ट ब्लॉकेजची समस्या उद्भवते.

F-Qs (संबंधित प्रश्न) कोलेस्ट्रॉल म्हणजे काय? कोलेस्ट्रॉल हा चरबीसारखा पदार्थ आहे जो यकृतात तयार होतो आणि शरीराच्या सर्व पेशींमध्ये आढळतो. पेशींच्या पडद्याचा मूलभूत घटक म्हणून, व्हिटॅमिन डी आणि हार्मोन्स बनवण्यासाठी हे आवश्यक आहे. कोलेस्ट्रॉलची पातळी मोजणे: तुमच्या रक्तातील कोलेस्ट्रॉलची पातळी मोजण्यासाठी लिपोप्रोटीन पॅनेल (Lipoprotein Panel) केले जाते.

## तोंडात वाढलेल्या जखमा- अल्सर एका रात्रीत बरे! 'या' पदार्थांच्या सेवनामुळे विटामिन बी १२ ची कमतरता होईल दूर



शरीरात निर्माण झालेली विटामिनची कमतरता आरोग्यासाठी घातक ठरतात. यामुळे शरीरात लहान मोठे बदल दिसून येतात. विटामिन बी १२ ची कमतरता निर्माण झाल्यानंतर बऱ्याचदा तोंडात जखमा होणे, अल्सर किंवा बारीक बारीक फोड येतात. हे फोड आल्यानंतर तोंडात अतिशय तीव्र वेदना होतात, ज्यामुळे अन्नपदार्थ खाण्याची अजिबात इच्छा होत नाही. याशिवाय बोलताना खूप जास्त त्रास होतो. शरीरात वाढलेल्या उष्णतेमुळे सुद्धा तोंडात अल्सर येतात. अपचन किंवा आरोग्यासंबंधित इतर समस्या उद्भवल्यानंतर सुद्धा तोंडात अल्सर येण्याची शक्यता असते. विटामिनची कमतरता निर्माण झाल्यानंतर सगळ्यात आधी दिसून येणारे लक्षण म्हणजे तोंडात जखमा होणे किंवा बारीक बारीक फोड येणे.

तोंडात आलेले फोड किंवा अल्सर घालवण्यासाठी अनेक वेगवेगळे उपाय किंवा गोळ्या औषधांचे सेवन केले जाते. पण तरीसुद्धा काहीच फरक दिसून येत नाही. हे फोड घालवण्यासाठी जीवनशैलीत बदल करणे आवश्यक आहे. पौष्टिक आहार, पुरेशी झोप आणि जीवनशैलीतील बदलांच्या परिणामामुळे तोंडात आलेले फोड कमी होतील. आज आम्ही तुम्हाला तोंडात आलेले अल्सर कमी करण्यासाठी आहारात कोणत्या पदार्थांचे सेवन करावे, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. या पदार्थांच्या सेवनामुळे रातोरात अल्सर आणि तोंडातील जखमा दूर होतील.

दही ताक: शरीरात वाढलेल्या उष्णतेमुळे तोंडात फोड किंवा अल्सर येतात. अशावेळी आहारात थंड पदार्थांचे सेवन करणे आवश्यक आहे. दही, ताक, लस्सी किंवा इतर थंड पदार्थांच्या सेवनामुळे शरीरात वाढलेली उष्णता कमी होईल. दह्यामध्ये असलेल्या घटकांमुळे आतड्यांमध्ये चांगले बॅक्टरीया वाढतात आणि आरोग्य सुधारण्यास मदत होते. शरीरात साचून राहिलेल्या विषारी घटकांमुळे आरोग्याला हानी पोहचण्याची जास्त शक्यता असते. त्यामुळे शरीरात साचून राहिलेले विषारी घटक बाहेर पडून जाणे आवश्यक आहे. दुपारच्या जेवणात नियमित एक वाटी दही खाल्यास पोटात वाढलेली जळजळ कमी होईल.

हिरव्या पालेभाज्या: लहान मुलांपासून अगदी मोठ्यांपर्यंत अनेकांना पालेभाज्या खायला अजिबात आवडत नाही. पालेभाज्यांचे नाव घेतल्यानंतर मुलं नाक मुरडतात. पण असे न करता रोजच्या आहारात नियमित पालेभाज्यांचे सेवन करावे. पालेभाज्या खाल्यामुळे शरीराला आवश्यक पोषण मिळते. पालेभाज्या खाल्यामुळे तोंडात आलेल्या लहान लहान जखमा कमी होतात आणि तोंडात वाढलेली जळजळ कमी होते. लिंबू: दैनंदिन आहारात विटामिन सी युक्त पदार्थांचे नियमित सेवन करावे. लिंबू पाण्याच्या सेवनामुळे आरोग्य सुधारते. याशिवाय तोंडात आलेले फोड किंवाजखमा बऱ्या होतात. यासाठी नियमित सकाळी उठल्यानंतर उपाशी पोटी लिंबू पाण्याचे सेवन करावे. लिंबू पाण्याच्या सेवनामुळे शरीरातील घाण बाहेर पडून जाईल आणि आरोग्य सुधारेल. पेरू, लिंबू, मोसंबी किंवा आंबट फळांचे सेवन करावे.

## साध्या कढीला द्या मसालेदार तडका! सोप्या पद्धतीमध्ये घरी बनवा चविष्ट मसाला कढी, वाफाळत्या भातासोबत लागेल सुंदर



आठवड्यातून एकदा प्रत्येक घरात कढी बनवली जाते. कधी टोमॅटोची कढी बनवली जाते तर कधी कोकम कढी बनवली जाते. घाईगडबडीच्या वेळी झटपट काय बनवावं बऱ्याचदा सुचत नाही. अशावेळी अनेक लोक बाहेरून विकत आणलेले पदार्थ खातात. पण कायमच विकतचे पदार्थ खाण्यापेक्षा घरी सोप्या पद्धतीमध्ये तुम्ही कढी बनवू शकता. आज आम्ही तुम्हाला मसाला कढी बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. हा पदार्थ गरमागरम भातासोबत किंवा इतर सर्वच पदार्थांसोबत अतिशय सुंदर लागतो. दह्याची कढी बनवल्यानंतर त्यात बेसन आणि इतर पदार्थ टाकले जातात. ज्यामुळे कढी चव अतिशय सामान्य लागते. पण कढी आणखीनच झणझणीत होण्यासाठी तुम्ही कढीला मसाल्यांचा तडका देऊ शकता. यामुळे कढीची चव आणखीनच वाढेल आणि जेवणात चार घास जास्त जातील. गरमागरम भातासोबत मसाला कढी अतिशय सुंदर लागते. चला तर जाणून घेऊया मसाला कढी बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य:

दही
बेसन
मोहरी
जिरं
लसूण
मीठ
कढीपत्ता
मेथी दाणे
आलं लसूण पेस्ट
हिरवी मिरची
लाल तिखट
तिखट मिरची
हिंग

कृती:

मसाला कढी बनवण्यासाठी सर्वप्रथम, वाटीमध्ये दही घेऊन व्यवस्थित फेटून घ्या. त्यानंतर अर्धा किंवा एक चमचा बेसन टाकून पुन्हा एकदा व्यवस्थित मिक्स करा.

मिक्स करताना बेसनमध्ये अजिबात गुठळ्या ठेवू नये. यामुळे कढी व्यवस्थित होत नाही.

टोपात तेल गरम करून घ्या मोहरी, जिरं, हिंग आणि कढीपत्त्याची पाने, मेथी दाणे टाकून मिक्स करा. त्यानंतर त्यात किसलेलं आलं, लसूण घालून फोडणी भाजा.

त्यानंतर त्यात थोडासा कांदा टाकून लाल होईपर्यंत भाजून घ्या. कांदा व्यवस्थित भाजल्यानंतर त्यात तयार केलेले बेसनाचे मिश्रण ओतून आवश्यकतेनुसार पाणी घालून मिक्स करा.

त्यानंतर त्यात चवीनुसार मीठ घालून मिक्स करा. कढीला उकळी आल्यानंतर गॅस बंद करून घ्या.

फोडणी तयार करताना फोडणीच्या वाटीमध्ये तेल गरम करून त्यात जिरं, कढीपत्ता आणि लाल घालून फोडणी मिक्स करा आणि तयार केलेल्या कढीमध्ये ओतून व्यवस्थित मिक्स करा. तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेली मसाला कढी. हा पदार्थ सगळ्यांचं खूप जास्त आवडेल.

## रात्रीच्या जेवणाला बनवा गरमा गरम आणि पोटभरणीचा मसालेदार 'सोया पुलाव'; वरून घाला तुपाची धार अन् रंगतदार करा मेजवानी

भारतीय खाद्यसंस्कृतीमध्ये पुलावाला एक वेगळेच स्थान आहे. भातावर आधारित हा पदार्थ हलका, झटपट तयार होणारा आणि चविष्ट असल्यामुळे घरगुती जेवणात, डब्यात किंवा खास पाहुण्यांसाठी बनवला जातो. पुलावाची खासियत म्हणजे त्यात वापरलेले विविध मसाले, भाज्या आणि कधी कधी वेगवेगळे प्रोटिनयुक्त घटक. आजकाल आरोग्यदायी आहाराला अधिक महत्त्व दिले जात असल्यामुळे सोयाबीनचा वापर स्वयंपाकात वाढला आहे. सोयाबीनमध्ये भरपूर प्रोटिन असते आणि ते शरीरासाठी अत्यंत फायदेशीर मानले जाते.

सोया पुलाव हा एक पौष्टिक, चविष्ट आणि पोटभर जेवणाचा पर्याय आहे. यात सोयाबीनचे तुकडे, सुगंधी बासमती तांदूळ, मसाले आणि भाज्या घालून बनवला जातो. हा पुलाव केवळ प्रोटिनने समृद्ध नसून चवीलाही अतिशय छान लागतो. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांना आवडणारा हा पुलाव दुपारच्या जेवणात, रात्रीच्या डिनरमध्ये किंवा खास प्रसंगी सहज बनवता येतो.

साहित्य : २ कप बासमती तांदूळ १ कप सोयाबीन तुकडे (पाण्यात भिजवून दाबून पाणी काढलेले) १ मोठा कांदा (स्लाइस केलेला) १ टोमॅटो (बारीक चिरलेला) १ गाजर (लांब काप) ट कप मटार १ शिमला मिरची (चिरलेली) २ चमचे तेल/तूप १ तमालपत्र २ लवंगा २ हिरवी वेलची १ छोटा दालचिनी तुकडा १ चमचा आलं-लसूण पेस्ट २ हिरव्या मिरच्या (उभ्या चिरलेल्या) ट चमचा हळद १ चमचा गरम मसाला / बिर्याणी मसाला मीठ - चवीनुसार ४ कप पाणी कोथिंबीर कृती : प्रथम तांदूळ धुऊन २० मिनिटे पाण्यात भिजत ठेवा. सोयाबीनचे तुकडे गरम पाण्यात १० मिनिटे भिजवा, नंतर दाबून त्यातील पाणी काढून बाजूला ठेवा.

# राष्ट्रवादी (अजित पवार )गटाच्या ओबीसी सेलच्या केज ता.अध्यक्षपदी गोवींद ससाणे यांची निवड.

## सामाजिक सलोखा अबाधीत ठेवून विकासात्मक कामांना प्राधान्य देणार-गोविंद ससाणे.



केज/प्रतिनिधी सोनी जवळा गावचे सरपंच गोविंद ससाणे यांची राष्ट्रवादी (अजित पवार ) गटाच्या ओबीसी सेलच्या केज तालुका अध्यक्ष पदी राज्याचे उप मुख्यमंत्री मा. ना. अजित पवार यांच्या आदेशाने जेष्ठ नेते रमेश आडसकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच युवा नेतृत्व ऋषीकेश आडसकर यांच्या नेतृत्वा खाली ओबीसी सेलचे बीड जिल्हाध्यक्ष विजय धायगुडे यांच्या अध्यक्षते खाली निवड करण्यात आली. ओबीसी सेलच्या अध्यक्षपदी निवड झाल्याच्या निमीत्ताने गावकर्यांकडून आयोजीत सत्कार समारंभात बोलताना श्री.मिनाज पटेल यांनी सांगितले कि या निवडीला जातीय चष्म्यातून न पाहता, अठरापगड जातींच्या समाजाला योग्य न्याय देण्याचे काम करून सर्वांच्या विकासाकडे लक्ष केंद्रीत करणार तसेच या निवडीमुळे सोनी जवळा गावची जिम्मेदारी वाढली असून सामाजिक ऐक्य टिकवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील असे अंबाजोगाई साखर कारखान्याचे संचालक तथा ग्रामपंचायत सदस्य,मिनाज पटेल सर यांनी सांगितले. यावेळी बोलताना ओबीसी सेलचे केज तालुकाध्यक्ष श्री गोविंद ससाणे यांनी आपले विचार मांडताना सांगितले कि, राज्याचे उपमुख्यमंत्री मा.ना.अजित पवार साहेबांच्या, राष्ट्रवादी पक्षाच्या ध्येय धोरणा प्रमाणे पुढील वाटचाल आमचे जेष्ठ नेते रमेशराव आडसकर साहेबांच्या,ज्यांनी मला पद दिले त्यांच्या मार्गदर्शनाखाली युवा नेतृत्व ऋषीकेश आडसकर यांच्या नेतृत्वा खाली, तसेच ओबीसी सेलचे बीड जिल्हाध्यक्ष विजय भागवतराव धायगुडे यांच्या अध्यक्षतेखाली केली जाईल तसेच सध्या अतिवृष्टी ने केज तालुक्याती शेतकऱ्यांचे आतोनात नुकसान झाले असून आमचे जेष्ठ नेते मा. रमेशराव आडसकर शेतकर्यांच्या बांधावर जावून प्रत्यक्ष नुकसानीची पहाणी करत आहेत नुकसानी चा लाभ शेतकऱ्यांना मिळवून देण्यासाठी प्रयत्न करत आहेत. झालेल्या निवडीला जातीच्या चेष्म्यातून न पाहता, जातीय तेड निर्माण न करता, सामाजिक सलोखा अबाधित राखून अठरापगड जातींच्या नागरीकांच्या समस्या, अडचणी सोडवण्याचे काम करणार आहे तसेच बेरोजगार युवकांसाठी जिल्हा उद्योग केंद्राकडून व्यावसाय मार्गदर्शन शिबीर आयोजीत करून युवकांना व्यावसायाचे मार्गदर्शन करणार, सर्वांचा विकास करून दोन समाजातील दरी मिटवण्यासाठी, शेतऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी काम करत राहणार असे गोवींद बापू ससाणे,ओबीसी सेलचे (राष्ट्रवादी अजीत पवार ) गटाचे केज तालुकाध्यक्ष यांनी सांगितले सर्वांसाठी काम, सर्वांचा विकास करण्यासाठी काम करणार. यावेळी मान्यवरांची भाषणे झाली तसेच सत्कार समारंभ सोहळ्याचा समारोप झाला या प्रसंगी मिनाज पटेल सर, अंबाजोगाई साखर कारखान्याचे संचालक तथा ग्रामपंचायत सदस्य, वैजनाथ गायकवाड, जब्बार शेख, श्रीमंत गायकवाड, भागवत कोकाटे, सेवा सहकारी सोसायटी संचालक, अनिल ससाणे, सोमनाथ ससाणे, पांडुरंग ससाणे, श्रीराम ससाणे, हाजी महम्मद शेख, किरण ससाणे, पप्पू धेंडुळे, राहूल करपे, शिवाजी कोकाटे आदी ग्रामस्थ उपस्थित होते शेवटी गोविंद (बापू )ससाणे यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

# राष्ट्रीय अनुसूचित जाती-जनजाती विकास परिषद, नवी दिल्लीच्या मराठवाडा विभागप्रमुख पदी मिलिंद सोनकांबळे यांची नियुक्ती



लातूर/ प्रतिनिधी : राष्ट्रीय अनुसूचित जाती- जनजाती विकास परिषद, नवी दिल्लीच्या मराठवाडा विभाग प्रमुख पदी सामाजिक कार्यकर्ते, प्राणीमित्र श्री मिलिंद सोनकांबळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नवी दिल्ली येथील राष्ट्रीय संघटन प्रभारी श्री. पी. सी. बेरवाल (सेवानिवृत्त आय.ए.एस.) यांच्या कडून नुकतेच मिलींद सोनकांबळे यांना नियुक्तीचे पत्र प्राप्त झाले आहे. या परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रवीण मांगरिया, संरक्षक मा.ना.जुएलजी उराव, केंद्रीय मंत्री, जनजाती मंत्रालय, भारत सरकार, संरक्षक मा. मुकुलजी वासनिक, माजी केंद्रीय मंत्री, सामाजिक न्याय व अधि मंत्रालय, भारत सरकार, राष्ट्रीय संयोजक मा. फग्गन सिंह कुलस्ते, माजी केंदीय मंत्री व राष्ट्रीय अध्यक्ष, राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोग, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष श्री. रवी सोमकुवर यांच्या सुचनेनुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे. ही परिषद अनुसूचित जाती-जनजाती यांच्या सामाजिक उथ्थापनासाठी, अन्याय, अत्याचाराच्या विरोधात आणि विशेष त्यांच्या सम्यक कल्याणाकरिता कार्यरत आहे. ही परिषद एस.सी., एस.टी. कमिशन, भारत सरकार यांच्याशी सलंग्नित आहे. श्री. मिलिंद सोनकांबळे हे कृतिशील सामाजिक कार्यकर्ते आहेत. अंधश्रध्दा निमूर्लन, प्राणीकल्याण, पर्यावरण आदि क्षेत्रातील त्यांचे काम उल्लेखनिय आहे. त्यांच्य या नियुक्तीबद्यल सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

# प्रति हेक्टरी १ लाख रुपयांची तात्काळ नुकसान भरपाई द्यावी-शिवाजी ठोंबरे




केज/प्रतिनिधी बीड जिल्ह्यात गेल्या आठ दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. मोठ्या प्रमाणावर शेतपिके पाण्याखाली गेली असून जनावरांचे तसेच घरांच्या नुकसानीमुळे ग्रामीण भागातील नागरिकांचे हाल झाले आहेत. या पार्श्वभूमीवर छावा मराठा संघटनेकडून केज तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात असे नमूद करण्यात आले की, मुसळधार पावसामुळे तालुक्यातील विविध गावांमध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून शेतकऱ्यांचे हातचे पीक पाण्याखाली गेले आहे. त्याचबरोबर अनेक ठिकाणी जनावरांचा बळी गेला आहे तर घरांचे व वस्तूंचे नुकसान होऊन सामान्य शेतकरी व नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर हाल झाले आहेत. यामुळे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना प्रति हेक्टर एक लाख रुपयांची नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी छावा संघटनेकडून प्रशासनाकडे करण्यात आली. या प्रसंगी छावा मराठा संघटनेचे जिल्हा प्रमुख शिवाजी ठोंबरे, जिल्हा सचिव आसाराम बाबर, दिगंबर तपसे, महादेव धपाटे, भीमराव तपसे आदी पदाधिकारी उपस्थित होते. संघटनेकडून प्रशासनाने तात्काळ शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे ठोस निर्णय घ्यावेत, अन्यथा छावा संघटना तीव्र आंदोलन छेडेल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

# लक्ष्मण बेडसकरला तात्काळ अटक करा-केविसंस

केज/प्रतिनिधी केज येथील प्रभारी गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांच्यावर अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल झालेला असून आरोपी लक्ष्मण बेडसकरला तात्काळ अटक करा तसेच या घटनेत लोक घटनास्थळी काही मिनिटात पोहोचले तसेच त्यांनी घटनास्थळाचे व्हिडिओ काढलेले आहेत आणि आरोपी बेडसकरच्या गाडीतील मोबाईल काढून घेतला आहे. यामुळे या प्रकरणात लक्ष्मण बेडसकर तर दोषी आहेच परंतु निर्जन ठिकाणी पोहोचेपर्यंत सोबतच्या लोकांनी आरडाओरड का केली नाही अशा शंका उत्पन्न होत असल्याने सोबत असणाऱ्या व पाठलाग करत लगेच मागे पोहोचलेल्या लोकांचीही सखोल चौकशी करावी अशी मागणी केज विकास संघर्ष समितीने केली असून आरोपीला तात्काळ अटक करून पीडितेला न्याय न मिळाल्यास जनतेच्या सहभागाने तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही समितीच्या वतीने देण्यात आला आहे. केज येथे इयत्ता नववीत शिकणाऱ्या अल्पवयीन मुलीचा येथील प्रभारी गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांनी विनयभंग केल्याची तक्रार पीडितेने केज पोलिसांकडे केली आहे. मात्र आरोपी लक्ष्मण बेडसकर फरार आहे. बेडसकर यांच्या व्हायरल कॉल रेकॉर्डिंग पाहता हा व्यक्ती महिला व मुलींच्या सतत संपर्कात असल्याचे जाणवते. याच त्याच्या वृत्तीचा अंदाज घेऊन काही लोकांनी नियोजनबद्ध पद्धतीने त्याला जाळ्यात ओढले आहे. मात्र याच वेळी अशा जाळ्यात अडकण्यासाठी बेडसकर काही लहान बालक नाही. त्यामुळे प्राप्त माहितीवरून या प्रकरणात समाज व कायद्याच्या नजरेत निर्दोष दिसत नाही. तर दुसऱ्या बाजूला या प्रकरणाचा फायदा घेऊन या घटनेला घडवण्यासाठी काही लोकांची टोळी मदत व काम करत असण्याची शक्यताही बोलली जाते.



त्यामुळे केज पोलिसांनी या प्रकरणात आरोपीला व या घटनेत प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभागी लोकांना ताब्यात घेऊन सखोल चौकशी करावी आणि या घटनेतील पूर्ण सत्य बाहेर आणावे अशी मागणीही समितीने केज पोलिसांकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. काही लोक आपल्या फायद्यासाठी अशा घटना पूर्वनियोजित पद्धतीने घडवून केज व परिसरात भीतीचे व चिंतेचे वातावरण बनवत असतील तर त्यांचा बंदोबस्त होणेही गरजेची आहे असेही निवेदनात म्हटले आहे. आरोपीला व प्रकरणात सहभागी लोकांना तात्काळ अटक न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा समितीच्या वतीने देण्यात आला आहे.

# महानगरपालिके मार्फत स्वच्छता हि सेवा पंधरवाडा अंतर्गत सायकल रॅली संपन्न

लातूर :- लातूर महानगरपालिके मार्फत शासनाच्या आदेशाप्रमाणे १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर स्वच्छता हि सेवा पंधरवाडा आयोजित करणेबाबत आदेशित केले असून आज दिनांक २४/०९/२०२५ रोजी आपलं लातूर सायकलोत्थान २०२५ कार्यक्रमाचे जिल्हाधिकारी कार्यालय, बार्शी रोड लातूर ते गंज गोलाई ते लातूर शहर महानगरपालिका पर्यंतचे आयोजन करण्यात आले सदर रॅलीस मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांनी हिरवा झेंडा दाखवुन सुरूवात केले.




स्वच्छता ही सेवा २०२५ पंधरवाडा निम्मीत विविध कार्यक्रम लातूर शहर महानगरपालिका येथे आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी यांच्या आदेशानुसार तसेच उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रम घेण्यात येत आहे. सदर रॅलीमध्ये मुख्य स्वच्छता अधिकारी श्री कलीम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख. श्री.रमाकांत पिडगे, मुख्य स्वच्छता निरीक्षक श्री.रवी कांबळे, श्री.धोंडिबा सोनवणे, श्री.शिवराज शिंदे, श्री.अक्रम शेख तसेच स्वच्छता निरीक्षक व लातूर सायकलिस्ट क्लबचे, श्रावण उगले, उपाध्यक्ष प्रतापसिग बिसेन, सचिव श्रीरंग मद्रेवार, साकलिष्ट सदस्य शब्बीर शेख, अभिजित देशपांडे, कुस्तीपटू चेतन जावळे, भाग्यश्री शिंदे, गंगाधर बिराजदार, संदेश महिंद्रकर व इतर उपस्थित होते.

# धनेगाव येथे आरोग्य तपासणी शिबिर संपन्न;१४० नागरिकांची तपासणी




केज/प्रतिनिधी स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियानांतर्गत आरोग्य वर्धिनी केंद्र, धनेगाव येथे आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन गावच्या सरपंच आकांक्षा गुजर यांच्या हस्ते संपन्न झाले. या शिबिरात समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील गोरमाळी यांनी असंसर्गजन्य आजार तपासणी, गरोदर मातांची तपासणी, हेमोग्लोबिन तपासणी तसेच विविध आजारांवर मार्गदर्शन व समुपदेशन केले. दिवसभरात एकूण १४२ नागरिकांची मोफत तपासणी करण्यात आली. शिबिरात एम.पी.डब्लू मनियार कैफ, ज्योती सोनवणे संध्या मुजमुले उषा इंगळे अर्चना मोरे या आशा कार्यकर्त्या यांच्यासह गावातील नागरिक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गंगा माऊली शुगरचा चौथा हंगाम बॉयलर अग्नी प्रज्वलन यावर्षी कारखाना विक्रमी गाळप करणार

केज/प्रतिनिधी केज तालुक्यासह बीड व धाराशिव जिल्हयात गंगा माऊली शुगर ने आपली वेगळी ओळख निर्माण केली असून अल्पावधीत शेतकऱ्यांच्या विश्वासास पात्र ठरलेल्या गंगा माऊली शुगरचे चौथे बॉयलर अग्निपदन गोटेगाव चे सरपंच तथा गंगा माऊली शुगरचे कौटुंबिक स्नेही शहाजी पवार व त्यांच्या पत्नी यांच्या शुभ हस्ते व ह.भ.प.किसन महाराज पवार, ह.भ.प.उद्धव बापू आपेगांवकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.

गंगा माऊली शुगरने जिल्ह्यात व जिल्ह्याच्या बाहेर देखील आपली वेगळी ओळख उसाच्या गळीत हंगामातून तयार केली असून गेल्या गळीत हंगामात कारखान्याने केवळ साखर निर्मिती असताना देखील सर्वाबरोबर २७०० रु भाव दिला व प्रत्येक पंधरवाड्याला हे पेमेंट ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मिळाले असून यामुळे शेतकऱ्यांना या कारखान्यावर विश्वासहर्ता निर्माण झाली आहे.


येणाऱ्या हंगामात कारखाना चांगल्या पद्धतीने गाळप करेल असा विश्वास यावेळी बोलताना कारखान्याचे संचालक आदित्य पाटील व राहुल सोनवणे यांनी व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमास कारखान्याचे व्हाईस चेअरमन हनुमंत मोरे, विखे पाटील कारखानाचे चेअरमन नवनाथ थोटे, बाबाराजे देशमुख, प्रवीणकुमार शेप, गणेश राऊत, बाळासाहेब ठोंबरे यांचेसह सर्व संचालक, कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री. मुजावर, शेतकी अधिकारी अविनाश आदनाक व सर्व विभाग प्रमुख, व शेतकरी आदींची उपस्थिती होती.




# राज्य शासनाने दिलेली मदतीची रक्कम तातडीने शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करावी -पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

## जिल्ह्यात पुरामुळे वाहून गेलेले रस्ते, पुलंच्या दुरुस्तीचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना

लातूर : - जिल्ह्यात ऑगस्ट महिन्यापर्यंत अतिवृष्टी, पुरामुळे झालेल्या नुकसानीसाठी राज्य शासनाने २४४ कोटी ३५ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. ही रक्कम नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यात तातडीने जमा करण्याची कार्यवाही करावी, अशा सूचना पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आज औसा शासकीय विश्रामगृह येथील आढावा बैठकीत दिल्या. आमदार संजय बनसोडे, आमदार अभिमन्यू पवार, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. सप्टेंबर महिन्यातही जिल्ह्यात अतिवृष्टी, पुरामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. या नुकसानीचे पंचनामे तातडीने करावेत. यामधून एकही नुकसानग्रस्त शेतकरी वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे पालकमंत्री श्री. भोसले यांनी सांगितले. पुरामध्ये वाहून गेलेल्या जनावरांच्या बाबतीत ग्रामपंचायतीचे प्रमाणपत्र ग्राह्य धरून मदत वितरीत करावी, अशा सूचना त्यांनी दिल्या. राज्यात पुरामुळे बाधित झालेल्या रस्ते, पुलांची दुरुस्तीचे काम तातडीने दुरुस्त करण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या आहेत. त्यानुसार लातूर जिल्ह्यातील पुरामुळे वाहून गेलेल्या पूल, रस्त्यांचा सर्व्हे करून त्यांच्या दुरुस्तीचा प्रस्ताव तातडीने सादर करावा, असे पालकमंत्री यावेळी म्हणाले. जिल्ह्यात विविध ठिकाणी पुरामध्ये अडकलेल्या शेतकरी, नागरिक यांच्या बचावासाठी जिल्हा प्रशासनाने अतिशय जलदगतीने कार्यवाही करत नागरिकांची सुटका केली आहे. याबद्दल आमदार अभिमन्यू पवार यांनी जिल्हा प्रशासनाचे अभिनंदन केले. तसेच सप्टेंबर महिन्यातील नुकसानीचे पंचमाने करताना एकही नुकसानग्रस्त शेतकरी सुटणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना केल्या. खरडून गेलेल्या जमिनींचा स्वतंत्र सर्व्हे करून मदत द्यावी, असे आ. पवार यावेळी म्हणाले. उदगीर, जळकोट तालुक्यातही अतिवृष्टीने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक गावांना जोडणारे पूल, रस्ते वाहून गेले आहेत. त्यांची तत्काळ दुरुस्ती आवश्यक असल्याचे आमदार संजय बनसोडे यांनी सांगितले. निवासी उपजिल्हाधिकारी श्री. नेटके यांनी अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात झालेल्या शेतपिक नुकसानीची माहिती दिली.



PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE